कार्यक्रम, मनोरंजन, स्पर्धा प्रदर्शन, शिबिरे इ. उपक्रम राबवून ग्रामीण व मागासवर्गीय घटकातील महिला, युवक व बालकाचे व्यक्तिमत्व व विकास घडविणे. युवक-युवतींच्या आर्थिक उन्नतीस हातभार लावणे. समाजातील दुर्बल घटकातील सर्व लोकांसाठी आवश्यक असणारे वैद्यकीय सुविधा व सम्युपदेशन केंद्र संस्थेद्वारे चालविणे. समाजातील दुर्बल घटकातील गरजू व आर्थिक दृष्टया मागासलेल्या वर्गासाठी आरोग्य शिबिरे आयोजित करून नामांकित व तज्ञ डॉक्टरांची सेवा व आहाराबाबतचा सल्ला, मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाईल. प्रौढ शिक्षण वर्ग चालविणे. सकस आहार योजनेची माहिती देणे. सामान्य मुलांकरीता शिक्षण प्राप्त करून देणेसाठी प्रयत्न करणे. महिलांवर होणारे अत्याचार याविषयी जनजागृती करणे त्यांचे प्रश्न सोडविणे. त्यांना योग्य तो न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे. महिलांना आधार देणे तसेच त्यांच्या विविध आजारांवर औषधोपचार करणे. निराधार व्यक्तींसाठी आश्रम सुरु करणे.

४) खेळाचा प्रसार व प्रचार करणे, युवकामध्ये खेळाच्या माध्यमातून व सांस्कृतीक कार्यक्रमाद्वारे युवकांचे शारिरीक, बौध्दीक व मानसिक क्षमता वाढविणे, युवकामध्ये सर्व प्रकारच्या खेळाची व व्यायामाची आवड निर्माण करणे. त्यांना प्रशिक्षण देणे. खेळाचे साहित्य उपलब्ध करूण देणे सामने भरवणे. तसेच युवक व युवतींना स्पर्धा परीक्षा, मार्गदर्शन, व्यवसाय प्रशिक्षण यांचे शिबीरे भरविणे. युवकामध्ये खेळ व व्यायामाबद्दल उत्सुकता निर्माण करून त्यांना खेळ व्यायामाचे अद्ययावत प्रशिक्षण देणे. व्यायामशाळा स्थापन करणे व बांधणे. किक, बॉक्सींग, मार्शल आर्ट, बद्दल युवकामध्ये उत्सुकता निर्माण करणे. महिलांच्या स्व संरक्षणासाठी कराटे. मार्शल आर्ट, कबड्डी, खो खो, हॉलीबॉल बद्दलचे प्रशिक्षण देवुन त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करणे. पारंपारीक देशी खेळ उदा. लाठी फिरवणे, खो खो मुद्गल फिरवणे, मातीतील कुस्ती, दंड, आदि बद्दल युवकांना माहिती देवुन त्यांच्या आवडी प्रमाणे खेळांमध्ये त्यांना निष्णात व पारंगत करून त्यांना स्पर्धा मध्ये भाग घेण्यास संधी उपलब्ध करून देणे धर्नुविदया, अॅथलॅटिक्स, बॅटमिंटन, बॉस्केटबॉल, बुध्दीबळ, कॅरम .कासकंट्री, क्रिकेटफुटबॉल, जिमनॅस्टिक, रिदमीक जिम्नस्टीक, हॉकी, हॅंडबॉल, ज्युदो, खो खो, कबड्डी, लॉनटेनीस, जलतरण टेबलटेनीस, हॉलीबॉल, वेटलीफॅटींग, वॉटरपॉलो, फॅनसिंग, मल्लखांब, रोलरासेकेटींग, सॉप्टबॉल, सायकलीग, थोबॉल, ब सबॉल, आदीबद्दल माहिती करून देणे. निष्णात व उत्कृष्ट प्रशिक्षकांची प्रशिक्षणासाठी नेमणुक करणे. पोहणे व क्रिडाप्रकारासाठी स्विमींग टॅंकची सोय उपलब्ध करून देणे. व्यायामासाठी, जिम्नॅशियमची सोय उपलब्ध करून देणे

५) सामाजिक व विधायक :- समाजातील अनिष्ट प्रथा व विरोधात जनजागरण करणे, अंधश्रध्दा निर्मुलन असे उपक्रमाची माहिती देणे, साक्षरता प्रसार, प्रौढ शिक्षण वर्ग सुरू करणे, पर्यावरण संतुलनासाठी सामाजिक वनीकरण, वृक्षारोपन असे उपक्रमाची माहिती देणे, श्रमदान शिबीरे, स्वच्छता मोहिमेची माहिती देणे, समाजातील निराधार, असहाय, वृध्दासाठी अत्याधुनिक सोयींनी सुसज्ज असा वृध्दाश्रमात सत्संगवर्ग, ध्यानधारणा, योगा इ. उपक्रम सुरू करणे. सभा संमेलने चर्चासत्र परिसंवाद कार्यशाळा यांचे आयोजन करणे. सर्वधर्म वधु वर मेळावे दरम्यान विविध सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करणे तसेच वधु वर मेळाव्यांचे आयोजन करणे तसेच रेशीमगाठी कार्यक्रम आयोजित करणे व सामुदायिक विवाह सोहळ्यांचे आयोजन करणे साहित्य संमेलन भरविणे, शहरी व ग्रामिण स्वच्छालय मोहिम राबविणे. गो शाळा चालविणे तसेच सामाजिक उन्नतीसाठी प्रयत्न करणे तसेच त्यांच्या अडी अडचणी सोडविणे त्यांचा विकास करणे तसेच धार्मिक समाज प्रबोधन शिबिर आयोजित करणे, या संस्थेमार्फत बहुजन समाजाच्या समस्या व अडीअडचणी सोडविण्याचा प्रयत्न करणे बहुजन समाजाच्या प्रगतीसाठी पयत्न करणे, सर्व समाज घटकातील

| श्री. योगेश अरूण ओव्हाळ | सौ. माया योगेश ओव्हाळ | सौ. कल्पना भाऊराव उपदेशे |
|---|---|---|
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

१०) वैज्ञानिक खेळणी, पोस्टर प्रदर्शन, स्वाक्षरी, शो चर्चासत्रे इ. चे ज्ञान देऊन मुलांमध्ये विज्ञान प्रसार करणे, निर्सगातील सर्व स्त्रोतांचा उपयोग करूण जनजागृती करणे.
११) सर्व रोग व निदान व उपचार शिबीरे, आरोग्य, रक्तदान शिबीरे आयोजित करणे.
१२) वृध्दाश्रमासाठी शासनाच्या विविध योजना अंमलात आणणे व वृध्दाश्रम सुरू करणे.
१३) निरनिराळे राष्ट्रीय उत्सव व सण साजरे करणे, उदा. १५ ऑगस्ट, २६ जानेवारी,महाराष्ट्र दिन साजरे करणे, तसेच सार्वजनिक गणेशोत्सव, दुर्गोत्सव, शिवजयंती, बकरी ईद, मोहरम इ. उत्सव साजरे करणे व त्या मधुन समाज प्रबोधन करणे संस्कारवर्ग सुरू करणे.
१४) नृत्य, नाटय, संगित ललीत कला, संस्कृती व साहित्य क्षेत्रात कार्यक्रमाचे आयोजन करणे, कला, हस्तकला, संगित, नृत्य यावर प्रशिक्षण देणे.
१५) भारताच्या उच्च व वैविध्यपुर्ण परंपरेचा परिचय करूण देणे, सांस्कृतिक कार्याविषयी परिषद, चर्चासत्रे सर्वेक्षण पथदर्शक प्रकल्प इ. आयोजन करणे.
१६) कायदयाच्या चौकटीत बसतील असे वरील उद्देशास पुरक विविध उपक्रम संस्थेच्या वतीने यशस्वीरित्या आयोजन केले जातील.

५) संस्थेचे नांव **"न्यू होप सोशल फाऊंडेशन पुणे"** यां संस्थेच्या नियमवली नुसारज्या कार्यकारी मंडळावर सदरहु संस्थेचा कारभार सोपविण्यात आलेला आहे. अशा पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांची संपुर्ण नांवे, पत्ता, हूद्दे, वय, व्यवसाय, व राष्ट्रीयत्व पुढील प्रमाणे राहतील. सभासद नावे -

| अ.क्र | सभासदाचे नाव व पत्ता | हूद्दा | वय | व्यवसाय | राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. योगेश अरूण ओव्हाळ<br>स. नं. १०३, जय प्रकाश नगर, येरवडा, पुणे ४११००६. | अध्यक्ष | ४३ | समाजसेवा | भारतीय |
| २. | श्री. भाऊराव लिंबाजी उपदेशे<br>सम्राट अशोक नगर, गालेगाव, मोहोने, कल्याण, ठाणे ४२११०२. | उपाध्यक्ष | ६७ | समाजसेवा | भारतीय |
| ३. | सौ. माया योगेश ओव्हाळ<br>स. नं. १०३, जय प्रकाश नगर, येरवडा, पुणे ४११०१४. | सचिव | ३८ | समाजसेवा | भारतीय |
| ४. | सौ. कल्पना भाऊराव उपदेशे<br>सम्राट अशोक नगर, गालेगाव, मोहोने, कल्याण, ठाणे ४२११०२. | खजिनदार | ३६ | समाजसेवा | भारतीय |
| ५. | श्री. शैलेश अरूण ओव्हाळ<br>एकता हाउसिंग सोसायटी, वॉटर टँक जवळ, थेरगाव, पुणे ४११०३३. | सदस्य | ४० | समाजसेवा | भारतीय |
| ६. | श्री. राहुल मधुकर खरात<br>स. नं. २७, १अ, फ्लॅट नं. १, ओम वृदावन, मुंजबा वस्ती, धानोरी, पुणे ४११०१५. | सदस्य | ४१ | समाजसेवा | भारतीय |
| ७. | श्री. सुश्रुत ज्ञानोबा जाधव<br>श्रावस्ती कॉलनी, बीड ४३११२२. | सदस्य | २७ | समाजसेवा | भारतीय |

६) आम्ही खाली सही करणार **"न्यू होप सोशल फाऊंडेशन पुणे"** चे सदस्य जाहीर करतो की, संस्था नोंदणी आधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात अणण्याची इच्छा असून वरील उद्येशाने आम्ही एकत्र येउन **"न्यू होप सोशल फाऊंडेशन पुणे "** ही संस्था आज दिनांक ०५/१०/२०२३ रोजी स्थापन केलेली असून ती संस्था नोंदणी अधिनियम सन १८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही या विधानपत्रावर सह्या केलेल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| श्री. योगेश अरूण ओव्हाळ<br>अध्यक्ष | सौ. माया योगेश ओव्हाळ<br>सचिव | सौ. कल्पना भाऊराव उपदेशे<br>खजिनदार |

अर्ज क्र. 7228
अर्जदाराचे नांव :- ॲड. पी. बी. राठोड
नक्कलेचा अर्ज आल्याचे दिनांक / 18/12/2023
नक्कल तयार दि.:- / 18/12/2023 परिशिष्ट "ब"
नक्कल दिली तो दि.

महा./ 1514 /2023 पुणे
दिनांक 12/ 12 /2023 पुणे

ज्ञापन (मेमोरंडम ऑफ असोसिएशन)

१) संस्थेचे नाव :– "न्यू होप सोशल फाऊंडेशन पुणे"
२) संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता :– व्दारा. श्री. शैलेश अरूण ओव्हाळ, स. नं. १०३, जय प्रकाश नगर, येरवडा, ता. हवेली, जि. पुणे ४११००६.
३) संस्थेचे कार्यक्षेत्र :– महाराष्ट्र राज्य तसेच भारत असे राहील.

सहाय्यक संस्था निबंधक
पुणे विभाग, पुणे

४) संस्थेचे उद्देश :–

१) शिक्षणाच्या विकासासाठी व प्रचारासाठी उपयुक्त अशा सर्व गोष्टी करणे, शिक्षणाच्या माध्यमातून विज्ञान, वाङमय, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्य करणे व विविध कला व त्याव्दारे योग्य ते उपयुक्त ज्ञान जनतेस देणे. शिक्षणाचा प्रसार, प्रचार करण्यासाठी बालवाडी , पुर्व प्राथमिक, प्राथमिक शाळा, माध्यमिक ,उच्च माध्यमिक , वरिष्ठ महाविद्यालये, शैक्षणिक संशोधन केंद्रे, ग्रंथालये, निरक्षता कमी करण्यासाठी प्रौढ शिक्षण केंद्र चालविणे, वसतीगृहे, आश्रम शाळा सोय करणे. संगणक शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी संगणक प्रशिक्षण केंद्र सुरू करणे, विकास कार्यक्रम, पुरस्कार देणे समाज व्यसण मुक्ती कार्यक्रम इ. उपक्रम आयेजन करणे, निसर्गोपचार केंद्र सुरू करणे, वैद्यकीय महाविद्यालय, उच्च तंत्र व अभियांत्रिकी व्यवसाय व व्यवस्थापकिय महाविद्यालय, शेती महाविद्यालय सुरू करणे. आयुर्वेदाचे महत्व समाजाला पटवून देणे वन औषधी वनस्पतीची लागवड करणे व त्यांचे संशोषन करणे व तज्ञांच्या मदतीने उपचार करणे. महाराष्ट्र शासन व त्याचप्रमाणे भारत सरकार यांचे शैक्षणिक योजनांचा प्रचार व प्रसार करणे, तसेच बार्टी, सारथी, महाज्योती यांच्या मार्फत विद्यार्थी प्रशिक्षण व संशोधन केंद्रा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहीती देणे.

२) आर्थिकदृष्ट्या कमकुवत मुला मुलींच्या शैक्षणिक विकासासाठी शालेय उपयोगी साहीत्य उदा. वहया पुस्तके इत्यादी साहीत्य पुरविणे, कार्यक्षेत्रातील गरीब व गरजु रूग्णांना वैद्यकिय सुविधा उपलब्ध करूण ॲम्ब्युलन्स सेवा पुरविणे, विविध आरोग्य शिबीरांचे आयोजन करणे, व्यसनमुक्ती केंद्र सुरू करणे व्यसनमुक्ती कार्यक्रम , अंधश्रध्दा निर्मूलन, साक्षरता मोहीम, तसेच दारूबंदी प्रचार व प्रसार कार्यक्रम आयोजित करणे, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रिडा , कला , युवा समाजकल्याण सल्लागार बोर्ड, आरोग्य कृषी विभागाच्या कल्याणकारी योजनीची माहिती देणे, महिला निराधार व निरश्रीत केंद्र, ग्रामीण महिला केंद्र, स्त्री आधार केंद्र, शिशु गृह, नर्सिंग होम, नर्सिंग कोर्सेस, मॉटेसरी, सी. टी. सी. कोर्सेस, इ. चालविणे, महिला व बाल कल्याण विभागांच्या,महिला आर्थिक विकास महामंडळाच्या कल्याणकारी योजनेचा प्रचार व प्रसार करणे, महीलांना शिवणकलेचे शिक्षण व प्रशिक्षण देणे त्यासाठी शिवणकला वर्ग चालविणे. कायदे विषयक मोफत सल्ला केंद्र सुरू करणे, समाजामध्ये नागरीकांची कर्तव्य या विषयी परिसंवाद आयोजित करणे व त्याची जागृती करणे. त्याच प्रमाणे आरोग्य शिक्षण , मानवी अधिकार समाजकल्याण याचा प्रचार व प्रसार करणे.

३) महिला व बालकल्याण विषयक : महिलांना स्वावलंबनाची जाणीव करून देणे, मागदर्शन करणे, त्यांना उदयोग धंदयाविषयी माहिती देणे. शासकीय योजनासंदर्भात मार्गदर्शन करणे तसेच प्रचार प्रसार व कार्यशाळा भरविणे. ~~महिलांनी आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासाठी त्यांना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देणे.~~ महिलांना संगणक प्रशिक्षण केंद्र सुरु करणे. त्यांच्या कला गुणांना वाव देणे. तसेच सर्व लोकांसाठी उदयोजकता वाढीस उपयोगी कार्यशाळा व्याख्याने. चर्चासत्रे आयोजित करणे. वंचित घटकांसाठी दिव्यांग मुले निराधार आई बाबा व इतर गरजुंसाठी काम करणे. संस्थेच्या दुर्बल घटकातील महिला सदस्य स्त्रियांना काम मिळवून देणे संदर्भात माहिती देणे. महिलांसाठी अनेक उपक्रम आयोजित करणे तसेच मोफत कपडे सायकल सॅनिटरी नॅपकीन इत्यादी वस्तूंचे वाटपाचे कार्यक्रम आयोजित करणे. स्त्रिया व तरूण तरूणी यांना मार्गदर्शन करून शासनाच्या विविध योजनांची माहिती देणे. ग्रामीण भाग व मागासवर्गीय लोकांसाठी संस्थेच्या माध्यमातून शिवणकाम, भरतकाम, बागकाम, संगणक प्रशिक्षण, टंकलेखन प्रशिक्षण अशा स्वरूपाचे विविध वर्ग चालविणे संदर्भात मार्गदर्शन करणे. मुलांच्या कला गुणांन विषयी प्रोत्साहन देणे. मार्गदर्शन करणे. सांस्कृतिक

अधिक्षक 8.12.23
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे विभाग, पुणे.

श्री नक्कल तयार केली
श्री वाचली
श्री रुजवात केली

| | | |
|---|---|---|
| श्री. योगेश अरूण ओव्हाळ | सौ. माया योगेश ओव्हाळ | सौ. कल्पना भाऊराव उपदेशे |
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

महा./ 1514 /2023 पुणे
दिनांक 12/12/2023 पुणे

सहाय्यक संस्था निबंधक
पुणे विभाग, पुणे

## परिशिष्ट क

## नियम आणि नियमावली

१. संस्थेचेनाव :– या संस्थेचे नाव "न्यू होप सोशल फाऊंडेशन पुणे" असे राहील.

२. संस्थेचा पत्ता :– व्दारा. श्री. शैलेश अरूण ओव्हाळ, स. नं. १०३, जय प्रकाश नगर, येरवडा, ता. हवेली, जि. पुणे ४११००६.

३. नियमावलीतील संदर्भिय शब्दांची व्याख्या:–

अ) संस्था याचा अर्थ "न्यू होप सोशल फाऊंडेशन पुणे" ही संस्था असा समजावा

कायद्याप्रमाणे याचा अर्थ सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये समजावा.

४. संस्थेचे कार्यक्षेत्र:– या संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य तसेच संपूर्ण भारत असे राहील.

५. हिशेबाचे वर्ष:–संस्थेचे हिशेबाचे वर्ष हे १ एप्रिल रोजी सुरू होऊन प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्चला समाप्त होईल

६. सभासदत्व व त्याची नोंदणीची पध्दत :–

संस्थेचे ध्येय धोरण उद्देश व नियमावली मान्य असलेल्या १८ वर्षावरील कोणत्याही भारतीय स्त्री/पुरूषास सभासद करून घेता येईल. सभासद होण्यास कार्यकारी मंडळाने तयार केलेल्या अर्जाप्रमाणे अर्ज भरून विहित केलेली फी/वर्गणी भरून सभासदत्व प्राप्त करून घेता येईल. संस्थेच्या सभासदत्वासाठी अर्ज प्रप्त झाल्यानंतर त्याची योग्य छाननी करण्यात येईल, कार्यकरी मंडळाने बहुमताने त्यांस मान्यता दिल्यावर अध्यक्षांचे मंजूरी स्वाक्षरी नंतर त्यांस संस्थेचा सभासद करुण घेण्यातय येईल. अशा रितीने नियमावलीतील नियमांच्या अधिन राहून सभासदत्व प्राप्त झाल्यानंतर त्यांचे नांव संस्थेच्या सभासद नोंदवही मध्ये नोंदविण्यात येईल. कार्यकारी मंडळाच्या निर्णय सर्व मान्य राहिल, ठरावान्वये या संस्था स्थापनेच्यावेळी त्या दिनांकास असणारे सर्व सदस्य हे आपोआपच संस्थेचे कायमस्वरुपी / आजीव सभासद समजले जातील. नियमावलीतील नियम सदर क्रमांक ६, ७ व ८ मधील तरतुदिंच्या अधिन राहुन नुसार मतदानाचा व निवडणूकीला उभे राहण्याचा अधिकार सभासदाला असेल.

सभासदत्वासाठी आलेला अर्ज कारण न देता नाकारण्याचा अधिकार विद्यमान कार्यकारी मंडळाला असेल. एकादा अर्ज नाकारल्यावर त्या व्यक्तीस पुन्हा २ महिने कालावधी पर्यन्त अथवा कार्यकारिणीच्या पूढील बैठकीच्या दिनांका पर्यन्त अर्ज करता येणार नाही. मात्र अर्जदाराने पून्हा अर्ज केल्यास त्यांच्या अर्जास प्रधान्य देण्यात येईल.

७.सभासदत्व रद्द होणे :–

खाली नमुद केलेप्रमाणे अनेक कारणांनी सभासदत्व रद्द होऊ शकते.

- नियमानुसार मासिक / वार्षीक वर्गणी न दिल्यास किंवा सलग ३ महिने फीन भरल्याससभासदत्व रद्द करणेत येईल.
- सभासदाची वर्तुणुक / वागणूक संस्थेच्या कार्यास घातक ठरत असेल, ज्ञापन / नियमावलीतील तरतुदींचे उल्लंघन करित असेल, निर्घुण कृत्य केल्यास, संस्थेस हानी / नुकसान होईल, अप्रतिष्ठा दुर्लौकीक होण्यास कारणीभूत ठरेल असे कृत्य केल्यास अशा सभासदाचे सभासदत्व रद्द करणेत येईल. अफरातफर अथवा संस्थेची फसवणूक केल्यास संस्थेविषयी अप्रचार केल्यास अथवा संस्थेस तौषिस लागेल असे कृत्य केल्यास अशा सभासदांचे सभासदत्व रदद् करण्यात येईल.
- फौजदारी खटल्यांस दोषी ठरून कायदेशीर शिक्षापात्र ठरल्यांस, कायद्यानुसार दिवाळखोर सिध्द झाल्यास सभासदत्व रदद् करण्यात येईल.
- संस्थेचे काम करण्यास कायदेशीर अपात्र ठरविले असल्यांस, लेखी स्वरुपात राजीनामा दिलेला असेल तर सभासदत्व रदद् करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| श्री. योगेश अरूण ओव्हाळ | सौ. माधवी योगेश ओव्हाळ | सौ. कल्पना भाऊराव उपदेशे |
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

* वैद्यकिय शारिरीक/मानसिक दृष्टया संस्थेचे काम करण्यास असमर्थ असल्यास, मृत्यु अथवा अन्य कारणाने सभासदत्व रदद् करण्यात येईल.

  सभासदत्व रदद् करण्याबाबतचे निर्णय कार्यकारी मंडळ बहुमताने घेईल.

८. सभासदांचे प्रकार :–

* अजीव सभासद :–

  संस्थेस एकरक्कमी रुपये १०००/–(अक्षरी एक हजार रुपये) देणाऱ्या वय वर्ष १८ वरील भारातीय व्यक्तीस अर्ज केल्यावर संस्थेचा अजीव सभासद कायमस्वरुपी सभासद म्हणून संबोधले जाईल. सदर वर्गणी भरल्यानंतर त्या व्यक्तीच्या अर्जास कार्यकारी मंडळाने मंजुरी दिल्यानंतरच पैसे भरल्याचे दिनांकापासून त्या व्यक्तीस आजीव सभासदाचा दर्जा प्राप्त होईल. ठरावान्वये या संस्था स्थापनेच्यावेळी त्या दिनांकास असणारे सर्व सदास्य हे आपेआपच संस्थेचे कायमस्वरुपी अजीव सभासद समजले जातील. आजीव सभासदांना मतदानाचा तसेच निवदणूकीस उमेदवार म्हणून उभे राहाण्याचा अधिकार असेल.

* सर्वसाधारण सभासदः–

  संस्थेकडे वार्षिक कालवधीसाठी वर्गणी/फी रुपये ५००/–(अक्षरी पाचशे रुपये) भरणऱ्या वय वर्ष १८ वरील भारतीय व्यक्तीस अर्ज केल्यानुसार संस्थेचा सर्वसाधारण सभासद म्हणून संबोधले जाईल. सदर वर्गणी भरल्यानंतर त्या व्यक्तीस अर्जास कार्यकारी मंडळाने मंजूरी दिल्यानंतरच पैसे भरल्याचे दिनांकापासून त्या व्यक्तीस सर्वसाधारण सभासदाला त्यांच्या सभासत्वाच्या कालावधीतच फक्त मतदानाचा अधिकार असेल. वार्षिक वर्गणी देणाऱ्या सभासदांना त्यांच्या सभासदत्वाच्या कालवधीतच मतदानाचा व निवडणुकीचा उमेदवार म्हणून उभे राहाण्याचा अधिकार असेल मात्र ज्या सभासदांनी संपूर्ण वर्गणी आलेली नाही अशा सभासदांना मत देण्याचा अधिकार अथवा निवडून येण्याचा अधिकार राहाणार नाही.

९. वार्षीक सर्वसाधारण सभा व तिची कार्य :–

वर्षिक सर्वसाधारण सभा ही संस्थेची सर्वश्रेष्ठ व अंतीम निर्णय देणारी सभा समजली जाईल. ही सभा वर्षामध्ये एकदा घेतली पाहीजे. या सभेत सर्वप्रकारचे विद्यमान सभासद भाग घेऊ शकतील, सभेचे स्थळ, दिनांक वेळ,गणसंख्या, अजेंडा या बाबतची सुचना सर्वांना सभेच्या किमान १५ दिवस अगेदर देणे आवश्यकराहील.

* सभेचे मागील इतिवृत्त वाचून कायम करणे/मान्यता देणे
* कार्यकारी मंडळाने चालविलेल्या कारभारावर नियंत्रण ठेवणे.
* वार्षीकहिशोब/जमा खर्च मंजुरी करणे.
* पुढील वर्षाचे अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
* वेळेवर येणाऱ्या ठरावावर नियंत्रण ठेवणे, संस्थेपुढील गहान व महत्वाच्या विषयावर चर्चा करणे व निर्णय घेणे.
* सनदी लेखापालाची निवड करुन त्यांचे मानधन ठरविण, इत्यादी या सभेचे कार्ये असतील.

१०. सर्वसाधारण सभा, सुचक व गणसंख्याः–

सर्वसाधाराण सभेचे स्थळ, दिनांक, वेळ, गणसंख्या, अजेंडा या बाबतची सुचना सर्वांना सभेच्या किमान १५ दिवस अगोदर देणे आवश्यक राहील. सभेची सुचना किमान १५ दिवस अगोदर अध्यक्षांच्या संमतीने सक्रेटरीने सर्वप्रकारच्या सभासदांना देणे आवश्यक राहिल. सुचनेमध्ये वरिल प्रमाणे महिती तसेच सभेपुढिल विषय नमुद करावेत. सभेची सुचना हस्तदेय, इमेल, वाट्अप किंवा डाकबुकावर सही नोंद घेऊन देता येईल अगर रजिस्टर टपालाव्दारे पाठविता येईल. एकुण सभासद संख्येच्या २/३ एवढे सभासद उपस्थित झाल्यास गणसंख्या पुर्ण झाली असे समजण्यांस येईल पुरेशी गणसंख्या न जमल्यास तहकूब / स्थगीत सभेला पुन्हा गणसंख्येचे बंधन राहणार नाही, पुरेशा गणसंख्ये अभावी स्थगीत सभा पुन्हा अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी घेण्यात येईल. मात्र अशा सभेत घेण्यात आलेला निर्णय सर्वावर बंधनकारक असेल परंतू अशी सुचना नमुद असणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| श्री. योगेश अरूण ओव्हाळ<br>अध्यक्ष | सौ. माया योगेश ओव्हाळ<br>सचिव | सौ. कल्पना भाऊराव उपदेशे<br>खजिनदार |

| अ.क्र | सभासदाचे नाव | सही |
|---|---|---|
| १. | श्री. योगेश अरूण ओव्हाळ<br>स. नं. १०३, जय प्रकाश नगर, येरवडा, पुणे ४११००६. | |
| २. | श्री. भाऊराव लिंबाजी उपदेशे<br>सम्राट अशोक नगर, गालेगाव, मोहोने, कल्याण, ठाणे ४२११०२. | |
| ३. | सौ. माया योगेश ओव्हाळ<br>स. नं. १०३, जय प्रकाश नगर, येरवडा, पुणे ४११०१४. | |
| ४. | सौ. कल्पना भाऊराव उपदेशे<br>सम्राट अशोक नगर, गालेगाव, मोहोने, कल्याण, ठाणे ४२११०२. | |
| ५. | श्री. शैलेश अरूण ओव्हाळ<br>एकता हाउसिंग सोसायटी, वॉटर टँक जवळ, थेरगाव, पुणे ४११०३३. | |
| ६. | श्री. राहुल मधुकर खरात<br>स. नं. २७, १अ, फ्लॅट नं. १, ओम वृदावन, मुंजबा वस्ती, धानोरी, पुणे ४११०१५. | |
| ७. | श्री. सुश्रुत ज्ञानोबा जाधव<br>श्रावस्ती कॉलनी, बीड ४३११२२. | |

वरीलसह्या करणाऱ्या इसमांना मी ओळखतो व त्यांनी माझे समक्ष या विधानपत्रावर सहया केल्या आहेत.

स्थळ :– पुणे

दिनांक :– ०५/१०/२०२३

Adv. Sachin T. Jadhav
ॲडव्होकेट
MAH/5729/2021

## प्रमाणपत्र

यावरून असे प्रमाणित करण्यात येते की, आम्ही सर्वजण असे कथन करतो की, " **न्यू होप सोशल फाऊंडेशन पुणे**" या नावाची अथवा या नावात साम्य असलेली दुसरी कोणतीही संस्था आमच्या उत्तम माहितीनुसार व समजुतीनुसार या भागात किंवा परिसरात अस्तित्वात नाही किंवा संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये संस्था नोंदविण्यात आलेली नाही.

| | | |
|---|---|---|
| श्री. योगेश अरूण ओव्हाळ<br>अध्यक्ष | सौ. माया योगेश ओव्हाळ<br>सचिव | सौ. कल्पना भाऊराव उपदेशे<br>खजिनदार |

५. विविध कार्यसूची तयार करावी.

६. संस्थेचे कर्मचारी तयार करावी.

७. संस्थेचे कोर्ट कचेरीचे कामकाज पाहणे.

८. संस्थेच्यावतीन रक्कम देवाण–घेवाण करणे. अवश्यक्तेनुसार अध्यक्षांच्या लेखी परवानगीने संस्थेचे रुपये १०००/– पर्यंतची रक्कम आकस्मिक खर्चासाठी आपल्या हाती ठेवावी.

९. वार्षीक हिशोब पत्रके व इतर महत्वाची विवरणपत्रके, महत्वाचे अहवाल वेळोवेळी तयार करवून घेणे व संबंधीत विभागांकडे विहित वेळेत सादर करणे.

१०. कार्यकारी मंडळाचे संमतीने किरकोळ नियम तयार करणे.

११. संस्थेच्या मोठया खर्चाची बिले मंजूर करणे, मालमत्तेची देखरेख करणे.

१२. संस्थेच्या अर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे.

१३. अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या अनुपस्थितीत संस्थेच्या सभांचे अध्यक्षपद स्विकारून संस्था हितार्थ कामकाज चालविणे

४) खजिनदार :–

१. खजिनदार यांनी अध्यक्षांच्या आदेशाने पालन करावे.

२. वार्षीक हिशोब पत्रके व इतर महत्वाची विवरणपत्रके तयार करणे व संबंधीत विभांगांकडे विहित वेळेत सादर करणे.

३. संस्थेच्या खर्चाची बिले मंजूर करणे, पावत्यांवर सह्या करणे, मालमत्तेची देखरेख करणे, मोठया खर्चाची बिले सचिवांच्या संयुक्त सहीने मंजूर करणे. संस्थेच्या अर्थिक परीस्थितीवर नियंत्रण ठेवणे

४. संस्थेच्या जमा खर्चाचे हिशोब ठेवणे व त्यासंबंधीच्या नोंदवह्या सुस्थितीत ठेवणे.

५. संस्थेच्या नांवे जमा झालेल्या रक्कमेपैकी जास्तीत जास्त रक्कम त्याच दिवशी सायंकाळ पर्यत अथवा दूसरे दिवशी सकाळी संस्थेच्या नावे असलेल्या बँक खात्यात जमा करावी.

६. खजिनदाराने सभासदांनी सूची तयार करुन त्यांचे वर्गणीचा हिशोब व्यवस्थित व अद्ययावत ठेवावा.

७. संस्थेच्या नावे वेळोवळी येणाऱ्या कोणत्याही रक्कमा, वर्गणी, देणग्या, प्रवेश शुल्क, निधी, चिजवस्तू, वैगरे स्विकाराव्यात अणि त्याबाबत छापिल अनूक्रमांकीत, संस्थेचा नोंदणी क्रमांक व कार्यालयाचा पत्ता असलेल्या पावत्या द्याव्यात.

८. लेखपरिक्षांनी काढलेल्या त्रुटींची पुर्तता करणे.

५) कार्यकारी सदस्य/सभासदः–

१. सर्व कार्यकारी सदस्यांनी अध्यक्षांच्या आदेशांचे पालन करावे व सचिवांना त्यांचे कार्यात परवानगी नुसार आवश्यकतेप्रमाणे मदत करावी.

२. सर्व सभासमध्ये उपस्थित रहाणे

३. संस्थेच्या कामकाजावर लक्ष ठेवणे

४. निवडणूकीस मतदान करणे

५. संस्थेस सूयोग्य निर्णय घेण्यास/योग्य निर्णय पारित करण्यास मदत करणे.

६. संस्थेचे नाव, कार्य सर्वसामान्यांपर्यत पोहचविणे कामी सर्वकामी करणे.

१५. <u>कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्य</u> :–

- कार्यकारी मंडळ संस्थेच्या सर्व कारभाराचे नियंत्रण व संचालन करेल.
- कार्यकारी मंडळ संस्थेच्या सभांमध्ये पारित झालेल्या सर्व ठरावांची पुर्तता करेल/करवून घेईल.
- संस्थेच्या स्थावर, जंगम मालमत्तेवर लक्ष ठेवणे, देखरेख करणे, तसेच त्यांची विहित नमुण्यात नोंद ठेवणे.

| | | |
|---|---|---|
| श्री. योगेश अरूण ओव्हाळ<br>अध्यक्ष | सौ. मोक्षा योगेश ओव्हाळ<br>सचिव | सौ. कल्पना भाऊराव उपदेशे<br>खजिनदार |

- मा. सहाय्यक संस्था निबंधक/मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचे कडे विविध विवरण पत्रके, हिशोबपत्रके, रिपोर्ट विहित वेळेत सादर करणे.
- संस्थेच्या हितार्थ कोर्ट कचेरीचे कामकाज करणे, न्यायालयांत दावे दाखल करणे व संस्थेच्या हितामध्ये कामकाज करणे जाहिरात देणे, संस्थेवर असलेल्या कायदेशीर बाबींची पूर्तता करणे.
- संस्थेच्या हितामध्ये आवश्यक ते आदेश परित करणे व योग्य ती पुर्तता करणे, विविध सेवा संहितांसाठी करार करणे
- विविध रक्कमांची देवाण घेवाण करणे.
- नियम व आवश्यक्तेनुसार सूचना देऊन सभांचे आयेजन करणे.
- संस्थेच्या हितामध्ये आवश्यक्तेनुसार नियम व नियमावलींच्या अणि उद्येशांच्या अधिन राहून नियम/पोटनियम तयार करणे, आवश्यक्तेनुसार त्यात बदल करणे.
- संस्थेच्या उद्येशपुर्तीसाठी विविध शाखांना मान्यता देणे/काढून घेणे, शाखा सुरु करण, बंद करणे.
- तक्रारीची दखल घेणे, योग्य ते दिशानिर्देश देणे/माहिती देणे.
- हिशोबांवर, जमा खर्चाच्या नोंदीवर नियंत्रण ठेवणे.
- आवश्यकतेनूसार स्थानिक समिती, उपसमिती नेमणे व काम पूर्ण होताच त्या बरखास्त करणे.
- सभासदत्वसाठी आलेल्या योग्य नमुन्यातील अर्जावर विचार करून निर्णय घेणे अणि मंजूर/नामंजूर करणे.
- कार्यकारी मंडळातील रिक्त पदे भरणे बाबत/कार्यकाल पूर्ण झाला आसल्यास नियमानूसार तात्काळ कार्यवही करणे, अचानक रिक्त झालेल्या पदाबाबत उरलेल्या कालवधीसाठी रिक्त पदे भरणे बाबत नियमांनुसार तात्काळ कार्यवही करणे.
- संस्था हितार्थ बहुमताने विविध निर्णय घेणे.

१६. <u>कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा</u> :—

- कार्यकारी मंडळाची सभा दोन महीन्यातून एक्दा आयोजित करण्यात येईल.
- कार्यकारी मंडळाच्या संमतीशिवाय/परवानगी शिवाय ठोस कारण नसतांना एखादया सभासद सतत ४ सभांना गैरहजर राहिल्यास विहित सूचना देऊन त्यांचे कार्यकारी मंडळाचे सभासदत्व रद्य केले जाऊ शक्ते.
- कार्यकारी मंडळाची सभा नियम व नियमावली नुसार घेत नसल्यास कार्यकारी मंडळातील १/३ सभासदांनी स्वतः सहीनिशी अध्यक्ष/सक्रेटरी यांचेकडे अर्ज करून सभा भरविण्याची मागणी केली पाहीजे. अथवा संस्थेच्या एकून सभासद संख्येच्या २/३ सभासदांनी लेखी मागणी केल्यास अध्यक्षांनी सदर मागणी प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत कार्यकारी मंडळाची सभा घ्यावी असे बंधन राहील. अध्यक्षांनी अशी सभा बोलवली नाही तर सक्रेटरींकडे पून्हा अर्ज केल्यास सक्रेटरींनी सदर सभा आयोजित करावी, या सभेला कार्य कारी मंडळाच्या सभेचे पूर्ण अधिकार असतील, सदर सभांच्या सूचनेमध्ये मागणीची सभा असे नमूद करणे आवश्यकआहे. कार्यकारी मंडळाची मागणीची सभा भरवून मागणी अर्जाप्रमाणे त्यावर निर्णय घेतला पाहिजे.

१७. <u>कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभेची सूचना व गणसंख्या</u> :—

- कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांना कार्यकारी मंडळाच्या सभेची लेखी सूचना सक्रेटरी/सक्रेटरीने कमीत कमी आठ दिवस अगोदर द्यावी, सभेची सूचना व अजेंडा रजिस्टर पोस्टने, नोंद घेऊन हस्तदेय पाठविले जाऊ शकतात तसेच सूचना कार्यालयाचे दर्शनी भागातील सूचना फलकावर लावण्यात येईल.
- सभेच्या सूचनामध्ये तारीख, वेळ, ठिकाण, नमूद असेल.
- कार्यकारी मंडळाच्या सभेत गणसंख्या (कोरम) ११अकरा पदाधिकाऱ्यांची असेल, गणसंख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास सदरील सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी आर्ध्यातासानंतर घेण्यात येईल. अशा सभेत गणसंख्येचे बंधन असणार नाही. तसेच सभेतील निर्णय बहुमताने घेण्यात येतील.

| | | |
|---|---|---|
| श्री. योगेश अरूण ओव्हाळ<br>अध्यक्ष | सौ. माया योगेश ओव्हाळ<br>सचिव | सौ. कल्पना भाऊराव उपदेशे<br>खजिनदार |

११.<u>विशेष सर्वसाधारण सभा व तिची कार्ये</u> :–

विशेष सर्वसाधारण सभा आवश्यकते नुसार केव्हाही घेता येईल, जी कार्य वार्षिक सर्वसाधारण सभा करु शकते अशी सर्व कार्य करण्याचा अधिकार विशेष सर्वसाधारण सभेला असेल. संस्थेच्या सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा अध्यक्षांच्या संमतीने कार्यकारी मंडळ आयोजित करेल किंवा सभासद संख्येच्या ३/५ सभासदांनी कार्यकारी मंडळाकडे लेखी मागणी केल्यास कार्यकारी मंडळाने तशी मागणी मिळाले पासुन ३० दिवसांच्या आत विशेष सर्वसाधारण बोलवतील / आयोजित करतील. विशेष सर्वसाधरण सभेसाठी मतदानाचा हक्क असलेल्या एकूण ३/५ सभासदांची गणसंख्या असेल. सुचने मध्ये वरील प्रमाणे माहिती तसेच सभेपुढील विषय नमुद करावेत.पुरेशी गणसंख्या न जमल्यास त्याच विषयाच्या सदर तहकूब / स्थगीत सभेला पुन्हा गणसंखेचे बंधन राहणार नाही. पुरेशा गणसंख्ये अभावी स्थगीत सभा पुन्हा अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी घेण्यात येईल. मात्र अशा सभेत घेण्यात आलेला निर्णय सर्वांवर बंधनकारक असेल.

१२. <u>संस्थेचे कार्यकारी मंडळ व त्यांची रचना</u> :–

संस्थेचे कार्य, व्यवहार पाहण्यासाठी कार्यकारी मंडळ / विश्वस्त मंडळ असेल, या मध्ये कमीत कमी ७ व जास्तीत जास्त ११ सदस्य/सभासद असतील, त्यांची रचना पुढील प्रमाणे राहील. १. अध्यक्ष, २. उपाध्यक्ष, ३. सचिव, ४.खजिनदार हे कार्यकारी सदस्य, सभासद / विश्वस्त असतील.

१३. <u>कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणूकीची पध्दत</u> :–

कार्यकारी मंडळाचा कार्यकाल हा ५ वर्षाचा राहील. दर ५ वर्षांनी संस्थेच्या एकुण सभासदांची यादी तयार करून वार्षिक सर्वसाधारन सभा बोलविण्यात येईल. सदर सभेमध्ये कार्यकारी मंडळाची निवड ही लोकशाही पध्दतीने किंवा बहुमताने करण्यात येईल. निवडणूकीची कार्यवाही ही संस्थेच्या जुन्या कार्यकारी मंडळाकडून केली जाईल. त्या करता एक महिना अगोदर सभासदांची यादी तयार करण्यात येईल ज्या सभासदांनी आपली वर्गणीची रक्कम पूर्णपणे भरलेली आहे. असे सभासद निवडणूकीत भाग घेण्यास पात्र ठरतील. इर आवश्यक्ता वाटल्यास नविन कार्यकारी मंडळाची निवड करण्याकरिता योग्यत्या व्यक्तीची निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येईल. व तेच निवडणूक निकाल जाहिर करतील.

१४. <u>कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कार्ये/जबाबदारी</u> :–

१) अध्यक्ष :–

१. संस्थेचाअध्यक्षांनी संस्थेच्या सभांचे अध्यक्षस्थान भूषवावे व नियंत्रण करावे.
२. संस्थेच्या सर्व सभांचे कामकाज नियम व नियमावली नूसार संस्थाहितार्थ चालवावे.
३. संस्थेच्या कारभारावर व त्यांच्या विविध शाखांवर नियंत्रण ठेवणे.
४. संस्थेच्यावतीने रक्कम देवाण–घेवाण करणे.
५. संस्थाहितार्थ विविध करार करणे.
६. सभासदांचा राजीनामा मंजूर करणे बाबत अंतिम अधिकर अध्यक्षांना राहील.
७. मतांची बरोबरी झाल्यास जास्तीचे मत/निर्णायक मत देण्याचा अधिकर अध्यक्षांनी बजवावा.
८. संस्था हितार्थ सर्व अंतीम अधिकर अध्यक्षांना असतील.

२) उपाध्यक्ष :–

१. उपाध्यक्ष यांनी अध्यक्षांच्या आदेशांचे पालन करावे.

३) सचिवः–

२. सचिव यांनी अध्यक्षांच्या आदेशांचे पालन करावे.
३. संस्थेच्या सर्व सभा आयोजित करणे तसेच प्रत्येक सभेचे इतिवृत्त, कार्यवृत्त हे इतिवृत्तनोंदवही मध्ये सुवाच्य अक्षरांत सुस्पष्ट लिहावे व पुढील सभेत ते वाचून दाखवावे.
४. संस्थेच्या नावे सर्व अधिकृत पत्रव्यवहार करावा.

| | | |
|---|---|---|
| श्री. योगेश अरूण ओव्हाळ<br>अध्यक्ष | सौ. माया योगेश ओव्हाळ<br>सचिव | सौ. कल्पना भाऊराव उपदेशे<br>खजिनदार |

२४. बँक खाते :–

संस्थेजवळ असलेली ठेवी, शिल्लक रक्कम कोणत्याही राष्ट्रीयकृत अथवा अनुसूचीत शेडयूल्ड बँकमध्ये खाते उघडण्यात येईल, त्यांत संस्थेचे अध्यक्ष, सचिव, खजिनदार या पदाधिकाऱ्यांपैकी कोणत्याही एका सदस्यांच्या सहीने पैशाची देवान घेवान करणे आवश्यक राहील. तसेच आवश्यकतेनुसार सहयांच्या अधिकार मध्ये बदल करण्यात येईल. व तसा फेरबदल करण्याचा अधिकार हा संस्थेच्या कार्यकारी मंडळास राहिल. व त्या अन्वये कर्यकारी मंडळाच्या सभेमध्ये ठराव संमत करून बँक खाते चालविण्याबाबत अन्य व्यक्तीस अधिकार प्रदान करतील. संस्थेचे शक्य तितके व्यवहार हे धनादेशाव्दारे करण्याचा प्रयत्न करण्यात येईल

२५. सभासदांची यादी :–

संस्थेच्या प्रत्येक प्रकारच्या सभासदांची यादी संस्था नोंदणी अधिनियम १८६० मधील कलम १५ नुसार तसेच संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियम १९१७ मधील चे कलम १५ अन्वये अनुसुची ६ प्रमाणे ठेवण्यात येईल. तसेच संस्था नोंदणी अधिनियम १८६० मधील कलम ४ नुसार व सन १९७१ च्या संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियमांमधील नियम ८ नुसार दरवर्षी संस्थेमध्ये नोकरीस लावलेल्या व्यक्तींच्या नोकरी संबंधी अटी बाबतचे विवरण संबंधीत अनुसुची २ च्या नमुन्यांत मा. सहाय्यक संस्था निबंधक यांचे कार्यालय पाठवावी लागेल.

२६. ज्ञापन, नियम व नियमावलीत बदल करण्याची तरतुद :–

- संस्थेच्या विधानपत्रात (ज्ञापनामध्ये), फेरबदल, वाढ, घट, विस्तार, अथवा काही बदल करावयाचा असल्यास संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १२ व १२ अ मध्ये असलेल्या तरतुदीप्रमाणे करता येईल.
- संस्थेच्या नियम व नियमावलीत दुरुस्ती, बदल–फेर फार, वाढ, घट, विस्तार अथवा काही बदल करावयाचा झाल्यास वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मतदानाचा हक्क असलेल्या एकुण सभासद संस्थेच्या ३/५ गणसंख्येने तसा ठराव समंत करावा लागेल, संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे तरतुदीचे पालन करून आवश्यक बदल करता येतील.

२७. संस्थेच्या नावांत किंवा उद्येशांत बदल करण्याची तरतुद :–

संस्थेच्या नावांत किंवा उद्येशांत बदल, वाढ, घट, विस्तार अथवा किंवा बदल करावयाचा असल्यास संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १२ व १२ अ मध्ये असलेल्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करता येईल. वार्षिक सर्व साधारण सभेमध्ये संस्थेच्या एकुण सभासद संख्येच्या ३/५ गणसंख्येने तसा ठराव संमत करावा लागेल.

२८. विसर्जन :–

जर काही कारणांमुळे संस्था बरखास्त करावयाची झाली तर वरील प्रमाणे सर्व सभासदांना १५ दिवस अगोदर नोटीस देऊन कळविण्यात येईल. याबाबत सुध्दा सर्व साधारण सभेमध्ये संस्थेच्या एकुण सभासद संख्येच्या ३/५ गणसंख्येने तसा ठराव संमत करावा लागेल.संस्थेचे सर्व देणे–घेणे आर्थिक व्यवहार पुर्ण करावे लागतील संस्थेची स्थावर–जंगम, शिल्लक मालमत्ता नोंदणीकृत संस्थेस दान/देणगी म्हणुन दिली जाऊ शकते तसेच संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १३ व १४ नुसार कार्यवाही पुर्ण करावी लागेल.

सर्व कायदेशिर सोपस्कार पुर्ण झाल्यावर त्याप्रमाणे संस्थेचे कार्य बंद करता यईल अथवा संस्था विसर्जित करता यईल.

सही शिक्क्याची खरी नक्कल

दाखला

प्रमाणित करण्यात येते की, "न्यू होप सोशल फाऊंडेशन पुणे" या संस्थेच्या नियम व नियमावलीची ही सत्यप्रत आहे.

मी नक्कल तयार केली
मी वाचली
मी रुजवात केली

अधिक्षक 18/1/23
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे विभाग, पुणे.

श्री. योगेश अरूण ओव्हाळ
अध्यक्ष

सौ. [illegible] योगेश ओव्हाळ
सचिव

सौ. कल्पना भाऊराव उपदेशे
खजिनदार

१८. <u>कार्यकारी मंडळाचे निवडणूकीचे नियम</u> :–

कार्यकारी मंडळाची निवड दर ५वर्षांनी होईल, वरीळा नियम क्र. ६, ७, ८, १०, ११ चे अनुसार सर्वसाधारण सभेत केली जाईल. कार्यकारी मंडळाची निवड झाल्यावर पहिल्या ७ दिवसानंतर अध्यक्षांच्या संमतीने कार्यकारी मंडळाची पहिली सभा घेण्यात येईल. कार्यकारी मंडळाच्या निवडणूकीस माण्यता देऊन हे कार्यकारी मंडळ कामकाजास सुरवात करेल, नविन कार्यकारी मंडळाची निवड दर ५ वर्षांनी वार्षिक सर्वसाधारण सभेत बहुमताने करण्यात येईल. काही कारणास्तव कार्यकारी मंडळामध्ये एखादे पद रिक्त झाल्यास ते पद कार्यकारी मंडळातील उर्वरीत सदस्य बहुमताने भरण्यात येईल

१९. <u>कार्यकारी मंडळाचे रिक्त पद भरणे बाबत नियम</u> :–

नियमावलीत नमुद केलेल्या कारणावरुण कार्यकारी मंडळातील रिक्त झालेली जागा भरवायची असल्यास त्यबाबत कार्यकारी मंडळातील सभेत त्यांची निवड करण्यात येईल या बाबत वरील नियम क्र. ६, ७, ८, १०, ११विचारात घेण्यात येतील व नियोजित पद संख्या पुर्ण करुन घेण्यात येईल व मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे त्याबाबतचा बदल अर्ज मान्यतेस्तव दाखल करेल,

२०. <u>संस्थेचा निधी, मिळकत व विनियोग</u>:–

सभासद फी, वर्गणी, अनुदान, बँकचे व्याज, प्रवेश शुल्क, देणगी, बक्षिस, दान, संस्थेच्या मालमत्ते पासुन येनारे उत्पन्न हे उत्पन्नचे प्रमुख स्त्रोत असतील. संस्थेच्या उद्येश पुर्तीसाठी व हिता साठी स्थावर मिळकत विकत घेणे, हस्तांतरीत करणे, कराराने घेण्याचा हक्क आहे, परंतू अशा स्थावर / जंगम मालमतेचा / मिळकतीचा विनियोग संस्थेच्या व सभासदांच्या हितासाठीच केला जाईल. आवश्यक त्या ठिकाणी मा.सहाय्यक / उप / सह / धर्मा दाय आयुक्त यांची कायदया प्रमाणे मंजूरी घेण्यात येईल.

२१. <u>उद्दीष्ट निहाय खर्चाची तरतुद</u> :–

- संस्थेच्या ज्या उत्पनाच्या साधनांतून फंड अथवा निधी जमा केला जाईल त्यातुन संस्थेवर असलेली जबाबदारी खर्च वजा जाता राहिलेल्या रक्कमेपैकी शिल्लक रक्कमेतुन उद्येशांत नमुद केलेल्या कारणांसाठी खर्च करण्यात येईल.
- आवश्यकतेनुसार सदर खर्चाच्या प्रमाणांत कार्यकारी मंडळाच्या ठरावन्वये बहुमताने केला जाऊ शकेल मात्र ठरावामध्ये या बाबतची ठोस कारणे नमुद करावी लागतील.

२२. <u>कर्ज किंवा ठेवी यासंबंधी तरतुद</u> :–

संस्थेला आवश्यक वाटल्यास कोणत्याही व्यक्ती / वित्तीय संस्थेकडुन ठेवी घेणे अगर कर्ज घेण्यासाठी सर्व साधारण सभेमध्ये ठराव बहुमताने मंजुर करावा लागेल. तद्नुसार संस्थेस हात उसनावर रक्कमा घेता येतील, कर्ज घेता येईल, ठेवी स्विकारता येतील, तारण / गहाण ठेवता येईल, मात्र या बाबत मा.सहाय्यक / उप / सह / धर्मादाय आयुक्त यांची कायदयाप्रमाणे पुर्वपरवानगी आवश्यक राहील.

२३. <u>स्थावर मालमत्ता खरेदी – विक्री करण्याबाबतची तरतुद</u> :–

संस्थेच्या हितासाठी, उद्येशपुर्तीसाठी स्थावर मालमत्तेची खरेदी – विक्री करता येईल. सर्वसाधारण सभेमध्ये या बाबतचा ठराव बहुमताने पारित करून त्याबाबत व्यवहार करता येईल, मात्र या बाबत मा.सहाय्यक / उप / सह / धर्मादाय आयुक्त यांची कायदयाप्रमाणे पुर्वपरवानगी आवश्यक राहील.

| श्री. योगेश अरुण ओव्हाळ<br>अध्यक्ष | सौ. माया योगेश ओव्हाळ<br>सचिव | सौ. कल्पना भाऊराव उपदेशे<br>खजिनदार |
|---|---|---|